| **योजनेचे नाव** | **कृत्रिम रेतन व मुरघास निर्मिती योजना** |
|---|---|
| **योजनेची सुरुवात** | सन २०२४-२५ |
| **लाभार्थी लक्षांक** | ४८० |
| **योजनेचा उद्देश** | नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार करुन दुग्ध व्यवसायास चालना देणे व कौशल्य विकासाच्या माध्यमातून स्वयंरोजगार व रोजगारक्षम मनुष्यबळ निर्माण करणे. |
| **योजनेचे स्वरूप** | तंत्रज्ञान प्रसार, निवासी व बिगरनिवासी प्रशिक्षणे |
| **प्रशिक्षण ठिकाण** | BAIF संस्था, ऊरुळी कांचन, पुणे |
| **प्रशिक्षण कालावधी/टप्पे** | ३० दिवसीय (classroom प्रशिक्षण) व ६० दिवसीय अनुभव प्रात्याक्षिक (क्षेत्रीय स्तरावर) |
| **लाभार्थी पात्रता** | या योजनेचा लाभ घेण्यासाठी लक्षित गटातील सदस्याना sarthi-maharashtragov.in या website वर जाऊन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदार हा खालील पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्ज केल्यानंतर संबंधित सारथीच्या विभागीय कार्यालयामार्फत online अर्ज यांची ऑनलाइन तपासणी व छाननी करून ऑनलाइन शिफारस करतील.<br>• शिक्षण- किमान १० वी पास<br>• वयोमर्यादा : किमान १८ वर्ष व कमाल ५० वर्ष.<br>• महाराष्ट्रातील अधिवास असावा.<br>• अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा – कुणबी आणि कुणबी – मराठा, जात प्रवर्गातील असावा.<br>• कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.<br>• सारथी, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत या प्रकारच्या या बाबीचा लाभ याअगोदर घेतलेला नसावा.<br>• ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर सारथीचे विभागीय कार्यालय मार्फत आपण केलेल्या अर्ज आणि कागद पात्रांची ऑनलाइन तपासणी केली जाते. योजनेच्या अटी शर्ती प्रमाणे सर्व कागदपत्र जोडलेली असल्यास ऑनलाइन शिफारस करतील. अर्जात त्रुटी असल्यास पुनःश्या आपल्याकडे पाठविण्यात येईल.<br>• ऑनलाइन प्राप्त झालेल्या त्रुटींची पूर्तता ऑनलाइन करावी लागेल. तसेच योजनेच्या अटी शर्तीची पूर्तता होत नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | |
| **आवश्यक कागदपत्रे** | ऑनलाइन अर्ज करताना अर्जदाराने खालील कागदपत्रांची PDF करून आपलोड करणे आवश्यक आहे. आपलोड केलेली सर्व कागदपत्र सुस्पस्ट व वाचनीय असावे<br>१. अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा – कुणबी आणि कुणबी – मराठा जात प्रवर्गातील असावा.<br>२. उत्पन्नाचा दाखला-नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र/ EWS प्रमाणपत्र / तहसिलदार यांचा मागील वर्षांचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाख रुपयांपेक्षा जास्त नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Income Certificate)<br>३. आधार कार्ड, जन्म दाखला अथवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र<br>४. बँक अकाउंट तपशील<br>५. रहिवासी दाखला(डोमिसाईल) |
| **लाभार्थी निवड प्रक्रिया** | १. लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्या करिता जाहिरात सारथीचे संकेत स्थळावर व राज्यातील वर्तमानपत्रा मध्ये प्रसिद्ध केली जाईल.<br>२. प्रथम येणाऱ्या पात्र अर्जदारांची निवड प्राधान्यांने करण्यात येईल.<br>३. प्रशिक्षण वर्गाच्या क्षमतेनुसार लाभार्थींना प्रशिक्षणाची तारीख व निवडीबाबत कळविण्यात येईल.<br>४. कुटुंबातील जास्तीत जास्त एकच सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाईल.<br>५. सदर प्रशिक्षण ही मोफत राहील. |
| **लाभाचे स्वरूप :** | ३० दिवसीय निवासी व ६० दिवसीय प्रक्षेत्रिय अनिवासी प्रशिक्षणाचा यामध्ये समावेश राहील. लाभार्थ्याचे ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण शुल्क सारथी, पुणे संस्थे मार्फत प्रशिक्षण संस्थेस अदा केले जाईल. ३० दिवसीय निवासीसह प्रशिक्षणाचाच पूढील टप्पा असलेले ६० दिवसीय अनिवासी कार्यानुभव प्रशिक्षणाकरिता देय शिष्यवृत्ती रक्कम ही ९० दिवसाचे यशस्वी रित्या प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांचे मागणी पत्र व प्रशिक्षण प्रमाणपत्र सादर केल्या नंतर प्रशिक्षणार्थीचे बँक खात्यावर ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने संस्थेचे शिफारस अहवालांनंतर अदा केली जाईल.<br>• ३० दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी पात्र उमेदवाराचे प्रशिक्षणस्थळी ३० दिवसाकरिता) निवास, एक वेळ चहा-नाश्ता, दोन वेळा चहा व दोन वेळ |

| | |
|---|---|
| | जेवणाची सोय ) प्रशिक्षण शुल्कामध्ये समाविष्ठ असेल प्रती प्रशिक्षणार्थी ३० दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी रु. ३६,३००/- प्रशिक्षण संस्थेला राहील.<br>• निवासी प्रशिक्षणांनंतर ६० दिवसीय क्षेत्रीय कार्यानुभव प्रशिक्षण या कालावधीत राहणे व निवास तसेच अनुषंगिक खर्चा साठी मासिक शिष्यवृत्ती र.रु. ३१६६/- प्रशिक्षणार्थी प्रती महिना दोन महिन्यासाठी देय राहील. |
| **प्रशिक्षण संस्थेबाबत** | • कृत्रिम रेतन प्रशिक्षणा मधील ६० दिवसीय कार्यानुभव प्रशिक्षणावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. ५.१.२०२४ रोजीचे शासन निर्णयान्वये निर्वाह भत्ता प्रशिक्षणार्थींना खात्यावर वर्ग केला जाईल.<br>• ९० दिवसीय प्रशिक्षणासाठी हमीपत्र व मॉडेल कोड ऑफ कंडक्ट (Model Code of Conduct) लागू राहील व उपक्रम प्रवेश निश्चित झाल्यानंतर भरुन घेतले जाईल व त्यानंतरच प्रवेश पत्र दिले जाईल.<br>• प्रशिक्षणार्थीकडून ३० दिवसाचे प्रशिक्षणादरम्यान होणाऱ्या सर्व वर्गांना हजर राहाण्याबाबत, व कार्यानुभवावेळी पूर्णपणे उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण करण्याबाबत तसेच प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास प्रशिक्षणावर झालेला खर्च सारथी संस्थेस परत करण्याबाबत हमीपत्र भरून घेतले जाईल. |
| **अपात्रतेचे निकष** | • कागदपत्रे अपूर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे.<br>• ऑनलाइन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची माहिती भरणे.<br>• सारथी अंतर्गत या उपक्रमातून या पूर्वी या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला असल्यास<br>• वयोगटात बसत नसल्यास<br>• नियमांचे उल्लंघन केल्यास |